**वादीतर्फे सा.क्र. ३ याचे पुढील सरतपास वादीतर्फे**
**विधीज्ञ श्री. पी. जी. पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरु**

मी लक्ष्मण काशिराम माळी, वय–५२ वर्षे, व्यवसाय– शेती, रा. दाऊळ, ता. शिंदखेडा, जि. धुळे शपथ घेऊन सांगतो की,

११. माझ्या सदरहु सरतपासाच्या शपथपत्रावरील सही माझी असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

**सरतपास पूर्ण**.

**वादी तर्फे सा.क्र. ३ याचा शपथेवर उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. एस. आर. पाटील यांचे मार्फत**

१२. माझे शिक्षण १२ वी पास इतके झालेले आहे. मी शेती व्यवसाय करतो. आम्ही तीन भाऊ व तीन बहिणी आहोत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांचे बायपास झालेले होते. माझ्या वडिलांना धरुन ते तीन भाऊ होते. माझे वडिल व काका यांच्यामध्ये झालेल्या वाटणीबाबतचा उतारा मी न्यायालयात दाखल केलेला आहे. माझे वडिल व काका यांच्यामध्ये सन १९९२–९३ मध्ये वाटणी झाली होती. माझे वडिल व काका यांच्यामध्ये १९९२–९३ दरम्यान झालेल्या वाटणीच्या वेळी जमीनीची मोजणी केली होती किंवा कसे हे मला माहित नाही.

१३. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी यशवंत बाबुलाल कोळी हे कल्याण येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी यशवंत बाबुलाल कोळी हा गावी तीन महिन्यातुन सहा महिन्यातुन येतो. मी स्वत:हुन सांगतो की, तो कधी महिन्यातुन पंधरा दिवसातुन देखील येतो. प्रतिवादी क्र. १ यशवंत बाबुलाल कोळी हा कधीपासुन कल्याण येथे राहतो याची मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व प्रतिवादी क्र. १ हे एकाच गावचे रहिवासी आहोत. माझ्या गावामध्ये व प्रतिवादी याच्या गावामध्ये एक कि.मी. इतके अंतर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र. १ हे गावी आल्यावर

कोठे राहतात याची माहिती ठेवतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ याने माझ्या आधी जमीनीची मोजणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोजणीच्या वेळेस मी, माझा भाऊ व वडिल असे उपस्थित होतो. हे म्हणणे खरे आहे की, मोजणीनंतर हद्द कायम करण्याबाबतची नोटीस आली तेव्हा प्रतिवादीच्या शेताची हद्द कायम करतेवेळी मी, माझे वडिल व भाऊ हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने पहिल्यांदा मोजणीकरीता पैसे भरले होते तेव्हा मी जमीनीची मोजणी होवु दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर प्रतिवादी याने पोलीस अधिक्षक यांचेकडे अर्ज करुन पोलीस संरक्षण घेवुन मोजणी केली होती. प्रतिवादी याने दि. २६.०६.२०१६ रोजी मोजणी केली होती. सदर मोजणी ही मोजणी अधिकारी यांनी मशीनच्या सहाय्याने केलेली नव्हती. सदर मोजणी टेपच्या सहाय्याने केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मोजणीच्या ठिकाणी ज्यावेळेस मोजणी अधिकारी जबाब घेतात त्यावेळेस तसा जबाब देण्यास मी नकार दिला होता. मी स्वत:हुन सांगतो की, मोजणी टेपच्या सहाय्याने असल्याने आम्ही मान्य केले नव्हते.

१४. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी यशवंत बाबुलाल याने केलेली मोजणी मी अदयापपावेतो अधिक्षक अभिलेख, धुळे किंवा अन्य शासकीय ठिकाणी आव्हानित केलेली नाही. मी स्वत:हुन सांगतो की, त्यानंतर मी स्वत:हुन मोजणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यशवंत बाबुलाल कोळी याने केलेली मोजणी योग्य व बरोबर होती. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. २९ च्या चतु:सिमेस लगत असलेल्या शेतकऱ्यांपैकी मी वगळता इतर कोणीही यशवंत बाबुलाल कोळी याने केलेल्या मोजणीस हरकत घेतली नव्हती.

१५. मी मोजणी केली त्यावेळेस प्रतिवादी हजर होते. मी दि. ०१.०३.२०१६ रोजी मोजणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी जी मोजणी केलेली आहे ती चुकीची करुन घेतलेली आहे. मोजणी अधिकारी यांचे नाव शिंत्रे असे होते. हे म्हणणे खरे नाही की, समता माध्यमिक विद्यालय व माझी शेती यांच्यामध्ये असलेल्या बांधावर

भरपुर झाडे होती. हे म्हणणे खरे नाही की, तेथे झाडे होती. मी स्वत:हुन सांगतो की, तेथे निंबाची नसुन बाभळीची झाडे होती. बाभळीची १० ते २० झाडे होती. हे म्हणणे खरे आहे की, त्याठिकाणी वनक्षेत्र अधिकारी हे पंचनाम्याकरीता आले होते. पंचनामा करीत असतांना मी उपस्थित होतो. गट क्र. ३० + ३१/६ या माझ्या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर बाभळीच्या झाडांच्या नोद नव्हती. वनक्षेत्र अधिकारी पंचनामा करीता जागेवर आले असता त्याठिकाणी मी एकटा हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, समता माध्यमिक विद्यालय व माझी शेती यांच्यामध्ये भरपुर मोठे अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, समता माध्यमिक विद्यालय यांनी ७/१२ उताऱ्यानुसार त्यांच्या असलेल्या जागेनुसार कुंपण करुन घेतलेले आहे. समता माध्यमिक विद्यालय व माझी शेती यांचा बांधाला बांध आहे. समता माध्यमिक विद्यालय यांचा गट क्र. २९/२ असा आहे.

१६. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ४ मधील सर्व मजकुर हा मी खोटा कथन केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी मंडपचा व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही एकमेव उत्पन्नाचे साधन असल्याचे मी खोटे कथन केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ याने मला कधीही शिवीगाळ अथवा दमदाटी केलेली नाही. त्याने केलेल्या शिवीगाळ व दमदाटीबाबत मी पोलीस स्टेशनला तक्रार केलेली आहे. मी दि. १७.०५.२०१६ रोजी तक्रार केलेली आहे. तसेच मी दि. २३.०५.२०२३ रोजी देखील तक्रार केलेली आहे.

१७. प्रतिवादी यांची शेती जिजाबराव नामदेव कोळी हा कसुन खातो. हे म्हणणे खरे आहे की, शेतामध्ये जिजाबराव हा एकटा राबतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ४ हे १५ दिवसांतुन शेतात येत असतात. जोपर्यंत दाव्याचा निकाल लागत नाही तोपर्यंत बांधावरील झाडे तोडणार नाही असे मी व प्रतिवादी यांनी पोलीस स्टेशन येथे लिहुन दिले नव्हते. बांधावरील बाभळीच्या झाडांच्या लाकडाच्या काटक्या जागीच सडुन गेल्या. हे म्हणणे खरे नाही की, दोन दिवसांपुर्वी मी प्रतिवादी यांच्या शेतातुन जेसीबीच्या सहाय्याने माती काढली. माझ्या शेतातील बांध जेसीबीच्या

सहाय्याने बांध घालतांना तेथीलच माती काढुन तेथे घातली होती. बांधावर बाभुळ नव्हते. मी जेसीबीच्या सहाय्याने माती काढुन बांध घातल्याबाबत प्रतिवादी याने पोलीस स्टेशनला तक्रार केली आहे किंवा कसे हे मला माहित नाही.

१८. माझ्या शेतातुन झोतवाडेचा रस्ता जातो. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्ता हा पुढे समता माध्यमिक विद्यालयाच्या कुंपणाला लागतो. प्रतिवादी यांच्या आजोबांकडून माझ्या आजोबांनी ७० गुंठे जमीन विकत घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर ७० गुंठे जमीनीमध्ये पोटखराबा नव्हता. (आता साक्षीदारास नि.क्र. ५८ कडील फेरफार नोंदीचा उतारा दाखविण्यात आला.) आता मला दाखविण्यात आलेला नि. क्र. ५८ कडील फेरफार नोंदीच्या उताऱ्यामध्ये पोटखराबा नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजोबांनी प्रतिवादी यांच्या आजोबांकडून घेतलेल्या जमीनीत पोटखराबा नव्हता. माझे वडिल व काका यांचेदरम्यान वाटणी झाल्याबाबतची फेरफार नोंद उतारा मी न्यायालयात दाखल करण्यास तयार आहे.

१९. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी मला कुठल्याही प्रकारचा त्रास दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या वडिलांनी प्रतिवादी यांना आम्ही विष पिऊन घेवु, आत्महत्या करु अश्या स्वरुपाच्या धमक्या दिल्या होत्या. मी साक्षीदार देणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**.
**फेरतपास नाही**.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK
Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2025.07.05 11:53:53 +0530

स्थळ : दोंडाईचा,
दिनांक : ०४/०७/२०२५

(आदित्य घ. नाईक)
दिवाणी न्यायाधीश (क–स्तर),
दोंडाईचा

**प्रमाणपत्र**

मी, खात्रीपूर्वक कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे/न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव – गणेश साईनाथ अहिरे,

न्यायालयाचे नांव – दिवाणी न्यायालय क.स्तर, दोंडाईचा.

दिनांक – ०५/०७/२०२५.

सही/–
लघुलेखक–(श्रेणी–३)